“व्यवसाय नियोजन स्पर्धा (Business Plan Competition)” आयोजित करण्यासंदर्भातील मार्गदर्शक सूचना.

महाराष्ट्र शासन
कौशल्य विकास व उद्योजकता विभाग,
शासन निर्णय क्रमांक कौविउ-२०१९/प्र.क्र.११/अभियान-१,
दुसरा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २२ जुलै, २०१९.

<u>वाचा</u> : १) कौशल्य विकास व उद्योजकता विभाग शासन निर्णय क्रमांक कौविउ-२०१७/प्र.क्र.२४३/अभियान-१, दिनांक ०५/०२/२०१८.
२) कौशल्य विकास व उद्योजकता विभाग शासन निर्णय क्रमांक कौविउ-२०१९/प्र.क्र.११/अभियान-१, दिनांक २१/०२/२०१९.

<u>प्रस्तावना</u> :

राज्याच्या औद्योगिक तसेच आर्थिक विकासास चालना देण्यासाठी आणि देशातील बेरोजगारीच्या समस्येवर उपाययोजना करण्यासाठी नाविन्यपूर्ण संकल्पांवर आधारीत उद्योगांना प्रोत्साहन देण्याकरिता विभागाच्या दिनांक ०५/०२/२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये मंजूर करण्यात आलेल्या “महाराष्ट्र राज्य नाविन्यपूर्ण स्टार्ट-अप धोरण, २०१८ (Maharashtra State Innovative Start-up Policy, 2018)” च्या अनुषंगाने राज्यात स्टार्ट-अप संस्कृतीचा विकास करण्यासाठी विभागाच्या दिनांक २१/०२/२०१९ च्या शासन निर्णयान्वये राज्यात “व्यवसाय नियोजन स्पर्धा (Business Plan Competition)” आयोजित करण्यास मान्यता देण्यात आली आहे. सदर स्पर्धा आयोजित करण्यासंदर्भातील मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय</u> :

राज्यात स्टार्ट-अप संस्कृतीचा विकास करण्यासाठी विभागाच्या दिनांक २१/०२/२०१९ च्या शासन निर्णयान्वये राज्यात “व्यवसाय नियोजन स्पर्धा (Business Plan Competition)” आयोजित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

व्यवसाय नियोजन स्पर्धा (Business Plan Competition) आयोजित करण्यासंदर्भातील सोबतच्या परिशिष्ट-अ मधील मार्गदर्शक सूचनांना शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर मार्गदर्शक सूचनांच्या अनुषंगाने व्यवसाय नियोजन स्पर्धा (Business Plan Competition) आयोजित करण्यासंदर्भातील कार्यवाही महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीने करावी.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०७२२१५४५३५९९०३ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Gajanan Wasudev Gawande

Digitally signed by Gajanan Wasudev Gawande
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Skill Development And Entrepreneurship Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=598b4111a7392ee0c9038cf4c426c1f9ef65d75e9ac67ec77c38a9c5895cc932, serialNumber=92cce2bddffe9d1b98d5b31109f5f81e224273580cfca2f478d921078212cf69, cn=Gajanan Wasudev Gawande
Date: 2019.07.22 16:10:57 +05'30'

(गजानन वा. गावंडे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई,
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. मा.मंत्री, कौशल्य विकास व उद्योजकता यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
४. मा.राज्यमंत्री, कौशल्य विकास व उद्योजकता यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
५. मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद/विधानसभा यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
६. सर्व विधानपरिषद/विधानसभा सदस्य, महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई,
७. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई,
८. डॉ.रघुनाथ माशेलकर, वरिष्ठ शास्त्रज्ञ, CSIR, नॅशनल केमिकल लॅबोरेटरी, पाषाण रोड, पुणे-४११००८,
९. श्री.रतन टाटा, अध्यक्ष, टाटा ट्रस्ट, मुंबई,
१०. श्रीमती किरण मुजुमदार-शॉ, अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, बायोकॉन लिमिटेड, बंगळुरू, कर्नाटक,
११. प्रधान सचिव/सचिव, विज्ञान व तंत्रज्ञान विभाग, भारत सरकार,
१२. अतिरिक्त मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
१३. अतिरिक्त मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई,
१४. अतिरिक्त मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, कृषी विभाग, मंत्रालय, मुंबई,
१५. अतिरिक्त मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, उद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई,
१६. अतिरिक्त मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, ग्रामिण विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,
१७. अतिरिक्त मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,
१८. अतिरिक्त मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई,
१९. अतिरिक्त मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई,
२०. अतिरिक्त मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, माहिती तंत्रज्ञान संचालनालय, मंत्रालय, मुंबई,
२१. प्रधान सचिव, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, मंत्रालय, मुंबई,

२२. आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता संचालनालय, कोकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई,
२३. आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता तथा सदस्य सचिव, महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी, मुंबई.
२४. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी, मुंबई.
२५. सदस्य सचिव, राजीव गांधी सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी कमिशन, मुंबई,
२६. कुलगुरु, मुंबई विद्यापीठ, मुंबई,
२७. कुलगुरु, डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला,
२८. कुलगुरु, महाराष्ट्र पशु आणि मत्स्यविज्ञान विद्यापीठ, नागपूर,
२९. कुलगुरु, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक,
३०. कुलगुरु, इन्स्टिटट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी (ICT), मुंबई,
३१. अध्यक्ष, इंडियन मर्चंटस् चेंबर, मुंबई,
३२. अध्यक्ष, कॉन्फिडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्री, मुंबई,
३३. संचालक, इंडियन इन्स्टिटट्यूट ऑफ सायन्स एज्युकेशन ॲण्ड रिसर्च (IISER), पुणे,
३४. संचालक, इंडियन इन्स्टिटट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (IIT), मुंबई,
३५. संचालक, विश्वेश्वरय्या नॅशनल इन्स्टिटट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (VNIT), नागपूर,
३६. संचालक, इंडियन इन्स्टिटट्यूट ऑफ़ मॅनेजमेंट (IIM), नागपूर,
३७. संचालक, महाराष्ट्र हायब्रिड सिड्स कंपनी लिमिटेड (MAHYCO), जालना,
३८. श्री.दिनेश बाबुराव सूर्यवंशी, सहाय्यक प्राध्यापक, श्रीमती नरसम्मा हिरय्या एज्युकेशन ट्रस्टचे आर्टस, कॉमर्स व सायन्स महाविद्यालय, किरण नगर, अमरावती,
३९. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता-१/२), महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,
४०. महालेखापाल (लेखा परीक्षा-१/२), महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,
४१. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
४२. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
४३. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
४४. सर्व विभागीय आयुक्त,
४५. सर्व जिल्हाधिकारी,
४६. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी,
४७. संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
४८. सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर,
४९. उपसंचालक, विभागीय मुख्यालय, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता, मुंबई/पुणे/नाशिक/ औरंगाबाद/अमरावती/नागपूर,
५०. निवड नस्ती.

परिशिष्ट-अ

व्यवसाय नियोजन स्पर्धा (Business Plan Competition) संदर्भात मार्गदर्शक सूचना

राज्याच्या औद्योगिक तसेच आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी आणि देशातील बेरोजगारीच्या समस्येवर उपाययोजना करण्यासाठी नाविन्यपूर्ण संकल्पांवर आधारीत उद्योगांना प्रोत्साहन देण्याकरिता कौशल्य विकास व उद्योजकता विभाग शासन निर्णय क्रमांक कौविउ-२०१७/ प्र.क्र.२४३/अभियान-१, दिनांक ०५/०२/२०१८ अन्वये "महाराष्ट्र राज्य नाविन्यपूर्ण स्टार्ट-अप धोरण, २०१८ (Maharashtra State Innovative Start-up Policy, २०१८)" मंजूर करण्यात आले आहे. सदर धोरणाच्या अनुषंगाने राज्यात स्टार्ट-अप संस्कृतीचा विकास करण्यासाठी जिल्हा तसेच विभाग पातळीवर "व्यवसाय नियोजन स्पर्धा (Business Plan Competition)" आयोजित करण्यास कौशल्य विकास व उद्योजकता विभाग शासन निर्णय क्रमांक कौविउ-२०१९/प्र.क्र.११/अभियान-१, दिनांक २१/०२/२०१९ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.

व्यवसाय नियोजन स्पर्धा (Business Plan Competition) आयोजित करण्यासाठी खालीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना निश्चित करण्यात येत आहेत. तरी सदर सूचनांचे पालन करुन व्यवसाय नियोजन स्पर्धा आयोजित करण्यात याव्याात.

१) प्रत्येक जिल्ह्यास एका आर्थिक वर्षात एकदाच जिल्हास्तरीय व्यवसाय नियोजन स्पर्धा (Business Plan Competition) आयोजित करता येईल. तथापि, महसूली विभाग असलेल्या जिल्ह्यास आवश्यक वाटल्यास त्यांच्या जिल्ह्यात जिल्हा स्तराऐवजी विभाग स्तरावरील स्पर्धेचे आयोजन करता येईल.

२) स्पर्धेच्या खर्चास जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती यांची मान्यता घेण्यात येईल. जिल्हास्तरीय व्यवसाय नियोजन स्पर्धा (Business Plan Competition) आयोजित करण्याकरिता आयोजन खर्चाची मर्यादा रुपये १५.०० लाख (रुपये पंधरा लाख फक्त) व विभाग स्तरावरील व्यवसाय नियोजन स्पर्धा (Business Plan Competition) आयोजित करण्याकरिता आयोजन खर्चाची मर्यादा रुपये २५.०० लाख (रुपये पंचवीस लाख फक्त) इतकी राहील.

३) नियोजन विभाग शासन निर्णय क्रमांक जिनाप-२११४/प्र.क्र.२/२०१४/१४७१, दिनांक १४/०८/२०१४ अन्वये गठीत करण्यात आलेल्या जिल्हा नाविन्यता परिषदेमार्फत स्पर्धेचे

आयोजन करण्यात येईल. स्पर्धेच्या अनुषंगाने विविध बाबी उदा.स्पर्धेचे आयोजन, प्रसिद्धी, नवसंकल्पनांना सहाय्य इत्यादी करिता जिल्हा नाविन्यता परिषदेस जिल्हा स्तरावर भागिदाराची (Partners) निवड करता येईल.

४) जिल्हा नाविन्यता परिषदेद्वारे विविध प्रसार माध्यमे व सोशल मिडीयावरील जाहिराती, स्थानिक स्तरावर पथनाट्यांचे (Road Show) आयोजन इत्यादीद्वारे स्पर्धेची प्रसिद्धी करण्यात येईल. तसेच स्पर्धेत शालेय/महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा जास्तीत जास्त सहभाग होण्याच्या दृष्टीने विविध शैक्षणिक संस्थांमधून देखील स्पर्धेची व्यापक प्रसिद्धी करण्यात येईल.

५) व्यवसाय नियोजन स्पर्धेकरिता (Business Plan Competition) महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीकडून (Maharashtra State Innovation Society-MSInS) प्रत्येक जिल्ह्यास District ID व Password देण्यात येईल. याद्वारे संबंधित जिल्ह्यास स्पर्धकांचा संपूर्ण तपशिल ऑनलाईन उपलब्ध राहील.

६) ज्या जिल्ह्यास व्यवसाय नियोजन स्पर्धा आयोजित करावयाची आहे त्या जिल्ह्याने स्पर्धेचा विस्तृत तपशिल वेळापत्रकासह महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीस सादर करण्यात येईल.

७) महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीद्वारे स्पर्धेचा तपशिल व वेळापत्रक वेबपोर्टलवर प्रसिद्ध करण्यात येईल व स्पर्धकांना ऑनलाईन नोंदणीची सुविधा उपलब्ध करुन देण्यात येईल.

८) संबंधित जिल्हा/विभागातील समस्यांचे निराकरण करण्याकरिता उपयुक्त असलेल्या व प्रत्यक्षात उद्योगात रुपांतरीत होऊ शकणाऱ्या नाविन्यपूर्ण संकल्पना असलेल्या कोणत्याही व्यक्ती/गट/आस्थापना/संस्था यांना महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीच्या वेबपोर्टलवर विहित अर्ज दाखल करुन स्पर्धेत सहभागी होता येईल.

९) नाविन्यपूर्ण संकल्पना प्रत्यक्षात राबविण्याच्या दृष्टीने आवश्यक उत्पादन/सेवा/प्रक्रिया, संकल्पनांचा पुरावा (Proof of Concept) व संपूर्ण व्यवसाय नियोजनासह (Business Plan) स्पर्धकाने स्पर्धेत सहभागी होणे आवश्यक राहील.

१०) जिल्हा नियोजन समितीद्वारे ऑनलाईन प्राप्त झालेल्या अर्जांमधून निवडयोग्य स्पर्धकांना (१०० च्या मर्यादेत) त्यांच्या नाविन्यपूर्ण संकल्पना मांडण्याकरिता मंच उपलब्ध करुन देण्यात येईल.

११) स्पर्धेकरिता जिल्ह्यातील (विभाग स्तरावरील स्पर्धेच्या बाबतीत विभागातील) यशस्वी उद्योजक, व्यावसायिक, गुंतवणूकदार, बँका इत्यादींना (किमान पाच) जिल्हा नियोजन समितीद्वारे आमंत्रित करण्यात येईल.

१२) निवडयोग्य नाविन्यपूर्ण संकल्पनांचे परीक्षण करण्याकरिता जिल्हा नियोजन समितीद्वारे परीक्षकांची नियुक्ती करण्यात येईल.

१३) परीक्षकांद्वारे नाविन्यपूर्ण संकल्पनांचे परीक्षण करण्यात येईल व अंतिम विजेते घोषित करण्यात येतील. जिल्हास्तरीय स्पर्धा असल्यास ०५ च्या मर्यादेत व विभागस्तरीय स्पर्धा असल्यास १५ च्या मर्यादेत नाविन्यपूर्ण संकल्पना असतील. त्यामध्ये जास्तीत-जास्त ०८ संकल्पना संबंधित विभागस्तरीय जिल्ह्यातील व उर्वरित इतर जिल्ह्यातील असतील.

१४) अंतिम विजेत्यांची यादी म१४) अंतिम विजेत्यांची यादी महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीच्या वेबपोर्टलवर प्रसिद्ध करण्यात येईल.

१५) अंतिम विजेत्या प्रकल्पांना त्यांच्या संकल्पनांचा पुरावा (Proof of Concept-PoC) सिद्ध करण्यासाठी सदर प्रकल्प राज्य शासनाच्या ज्या विभागाशी संबंधित असेल त्या विभागामार्फत रुपये ५.०० लाख (रुपये पाच लाख फक्त) च्या मर्यादेत कार्यादेश देण्यात येतील. तथापि, कार्यादेशाची अदायगी जिल्हा नाविन्यता परिषदेद्वारे करण्यात येईल.

१६) जिल्हास्तरीय स्पर्धेचा संपूर्ण आयोजन खर्च जिल्हा नाविन्यता परिषदेद्वारे करण्यात येईल. तथापि, विभागस्तरीय स्पर्धा आयोजित करण्यात आली असल्यास आयोजन खर्चापैकी ५०% खर्च व इतर जिल्ह्यातील निवड झालेल्या स्पर्धकांच्या कार्यादेशाची अदायगी महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीद्वारे जिल्हा नाविन्यता परिषदेस करण्यात येईल.

१७) अंतिम विजेत्या प्रकल्पांना जिल्हा नाविन्यता परिषदेमार्फत किमान ६ महिने कालावधी-करिता मार्गदर्शन (Mentoring) करण्यात येईल. तसेच राज्य स्तरावर आयोजित करण्यात येणाऱ्या "महाराष्ट्र स्टार्टअप वीक (Maharashtra Startup Week)" मध्ये सहभागी होण्यासाठी निमंत्रित करण्यात येईल. तथापि, संबंधित अंतिम विजेत्यांनी विहित कार्यपद्धतीचा अवलंब करुन महाराष्ट्र स्टार्टअप वीकमध्ये सहभाग नोंदविणे आवश्यक राहील.

*****